Impact Factor – 6.261 ▪ Special Issue - 162-C ▪ Mar. 2019 ▪ ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

**RESEARCH JOURNEY**

UGC Approved Journal

Multidisciplinary International E-research Journal

# WOMEN EMPOWERMENT AND SCIENTIFIC CHANGE

... Executive Editor of this Issue ...

**Dinesh R. Jaronde**

... Chief Editor ...

**Dr. Dhanraj T. Dhangar**

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

*Printed by :* PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

४५. **भारतीय स्त्रीयांच्या सक्षमीकरणात संविधानाचे योगदान** ........ १३२
प्रा.मनोज सोनटक्के, प्रा.डॉ.मिलींद भगत

४६. **सक्षम महिला आणि राजकारण** ........ १३५
प्रा. डॉ. विठ्ठल गो. चव्हाण

४७. **महिलांचे आर्थिक सबलीकरण एक विवेचन** ........ १३७
प्रा. डॉ.अपर्णा अ. पाटील

४८. **मानवी अधिकार व महिला** ........ १३९
डॉ. विजय टोंगे

४९. **स्त्री सक्षमीकरणाचा ऐतिहासिक आढावा** ........ १४१
कु. प्रिया प्रकाशराव इंझळकर

५०. **ग्रामिण महिला व सक्षमिकरण क्षेत्रे** ........ १४४
प्रा. डॉ. दिवाकर एन. कामडी

५१. **महिला आरोग्य प्रबोधन ही काळाची गरज** ........ १४७
प्रा.डॉ.अर्चना आ. निखाडे

५२. **आधुनिक भारतातील एक महान सेवाव्रती : साधनाताई आमटे** ........ १४९
प्रा. डॉ. लखपती वा. गायकवाड

५३. **स्त्रियांचे बदलते सामाजिक, राजकीय व कौटुंबिक स्वरूप** ........ १५१
डॉ. सौ. एम. आर. वलीवकर

५४. **कायद्यातील तरतुदी व महिला सक्षमिकरण** ........ १५३
डॉ.बी.व्ही.डोंगरे (पाटील)

५५. **नैतीकता आणि महिला सशक्तीकरण** ........ १५६
डॉ. मोहन दे. वानखडे

५६. **महाराष्ट्राच्या राजकारणातील महिलांचा सहभाग** ........ १५९
डॉ. किशोर उत्तमराव राऊत

५७. **महिला व राजकारण** ........ १६२
प्रा. सौ. रायठक दिपमाला विश्वनाथ

५८. **कौटुंबिक कलह सोडविण्यांत महिला तक्रार निवारण केंद्राची भूमिका** ........ १६४
प्रा. डॉ. साधना डी. वाघाडे

५९. **महिलांचे राजकारणात सहभाग** ........ १६६
प्रा. डॉ. सुधाकर जावळे

६०. **आंबेडकरी विचारदृष्टी आणि स्त्री मुक्ती** ........ १६९
प्रा.डॉ. युवराज श्रीराम मानकर

६१. **महिला सक्षमिकरण व कौटुंबिक हिंसाचार** ........ १७३
प्रा. राजु दयारामजी चावके

६२. **अहिंसा : गांधीचींचा विचार आशय** ........ १७५
डॉ. माधव लक्ष्मणराव सोनेकर

६३. **संत नरहरी सोनार** ........ १७८
प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे

६४. **महिला सबलीकरण एक आव्हान** ........ १८१
प्रा. डॉ. दीपक आनंदराव चौरपगार

६५. **महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार** ........ १८३
प्रा.डॉ. गजानन रा. लोहवे

६६. **ग्रामीण पर्यटन : संधी व आव्हाने** ........ १८६
प्रा. निलेश दे. हलामी

६७. **भारतीय अर्थव्यवस्थेवर काळया पैशाचा प्रभाव** ........ १८८
प्रा.डॉ. जयेश मो. अवथरे

६८. **बालकांचे हक्क आणि भीक मागणारी रस्त्यावरील मुले** ........ १९१
निलेश रामराव मगर

Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

**RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal** ISSN : 2348-7143
*Impact Factor (SJIF) - 6.261 | Special Issue 162-C :* Women Empowerment & Scientific Change March 2019

# महिला सक्षमिकरण व कौटुंबिक हिंसाचार

**प्रा. राजु दयारामजी चावके**
सहाय्यक प्राध्यापक
आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय, देसाईगंज, जि. गडचिरोली-४४१२०७

**प्रस्तावना :**

स्त्रीला दररोजच्या जिवनात विविध प्रकारच्या कधी सुप्त तर कधी उघडपणे छळाला सामोरे जावे लागते. मग त्या स्त्रीचे शिक्षण किती आहे. पैसा आहे का, ती नोकरी करते का, असे कोणतेही समान निष्कर्ष नसतांनाही तिला छळ सहन करावा लागतो. अनेकदा तर आपला छळ होतो आहे हे देखील तीच्या ध्यानात येत नाही.

स्त्रीचा होणारा छळ आपल्या देखील आजुबाजुला होत असतो. अत्याचार हा शारिरीकच असला पाहिजे असा नाही. मानसिक अत्याचाराच्या खुणा, शारिरिक अत्याचाराप्रमाणे दिसल्या जरी नाहीत तरी त्यांचे घाव हे जास्त खोल आणि त्रासदायक असतात. 'तु गप्प बस, तुला काही कळत नाही'. 'मला अक्कल शिकवू नकोस' अशा प्रकारे बोलणारे आणि हे ऐकणाऱ्या स्त्रीया नेहमीच दिसतात. आपल्यावर अन्याय होतो आहे हे कळत असूनही सामाजिक प्रतिष्ठा सांभाळण्यासाठी तर कधी मुलांसाठी आणि काही वेळा आर्थिक कारणांमुळे तो सहन करत अनेक वर्ष संसार करणाऱ्या स्त्रिया पाहिल्या. त्यांच्यातले 'स्वत्व' हरवलेले पाहिले. त्यांना आपल्या हक्काचे पुरेशी माहिती नसल्याचे ही लक्षात आले. कायद्याची माहिती असणे म्हणजे लगेचच घर मोडायला निघणे मुळीच नाही, पण कायद्याबद्दल अनभिज्ञता असणेही बरोबर नाही. जेव्हा आपल्या हक्काची माहिती असते, ज्ञान असते तेव्हाच आपण आपल्या होणाऱ्या अत्याचाराविरुद्ध काही तरी पाऊले उचलू शकतो.

अत्याचार - मग तो शाब्दीक, मानसिक असो वा शारिरिक असो हा चुकीचाच आहे असा वाटतो. एक माणूस म्हणून मान मिळविण्याचा अधिकार स्त्री आणि पुरुषाला समान असावा असे वाटते. आपल्या समाजात एक तर स्त्रिया आपल्या छळाबद्दल मोकळेपणाने बोलत नाहीत. कौटुंबिक छळाची ज्या प्रकारची माहिती पाश्चत्य देशात मिळते, तशी माहिती आपल्या देशात मिळत नाही.

छळ झालेल्या बायकांना इतरांपेक्षा अस्वस्थता, नैराश्य, खाण्यामध्ये होणारे प्रकृतीमधील बिघाड, पुनरुत्पादन संबंधीच्या समस्या जसे गर्भपात जन्मत:च मृत झालेले मुल होणे, वेळेआधी प्रसुती होणे, लैंगिक आजार, नको असलेले गर्भारपण अथवा असुरक्षित गर्भपात असे अनेक त्रास सहन करावे लागतात.

दर चार पैकी एका स्त्रीला गरोदरपणातही छळाला सामोरे जावे लागते. या सर्वामुळे देशाच्या आरोग्य व पोलिस यांच्यावर होणारा खर्च वाढत जातो. त्याचबरोबर स्त्रियांची शैक्षणिक भरारी व कार्यक्षमता कमी होते, अमेरिकेत अशा प्रकारच्या हिंसेमुळे १२.६ बिलीयन डॉलर्स खर्च केले जातात. तर भारतात प्रत्येक छळाच्या प्रसंगामुळे बाईचे साधारणपणे सहा कामाचे दिवस वाया जातात.

सत्येच्या हव्यासातून गुलामगिरी निर्माण झाली ती मानसाच्या मेंदूतून निघालेली एक कुकल्पना आहे. गुलामाला मालकाच्या इच्छेनुसार जगण्याची आणि वागण्याची सक्ती असते आणि ती सर्व पातळ्यावर असते. स्त्रिला शारिरीक गुलामगिरीबरोबरच मानसिक गुलामगिरीत ढकलण्याची पुरुषांची युक्ती तिच्या लक्षात आली नाही. स्त्रिला कुटूंब आणि संगोपनाच्या नावाखाली घराच्या चार चौकटीत ठेवण्यात आले. शिक्षण हे सर्वासाठीच महत्त्वाचे पण त्यापासूनही तिला वंचित ठेवण्याच्या कल्पनेला स्त्रियांकडून विरोध झाला नाही.

स्त्रिया व तिच्या खाजगी जीवनातही अनेक बंधने होते. तिच्या विटाळाच्या दिवसात तीला बाहेर ठेवणे पौशहित्याच्या अधिकार नसणे या सारख्या रुढीमुळे स्त्रिची समाजातील दुय्यम भुमिका अजूनच ठळक होत गेली.

स्त्रि मुक्तीची पहिली लाट विसाव्या शतकाच्या सुरुवातीला आली. तेव्हा स्त्रिला मतदानाचा हक्क मिळावा आणि निवडणुकीला उभे राहण्याची मुभा मिळावी या विषयावर लढा झाला. व्हर्जिनिया वुल्फ या लेखिकेने आपल्या 'अ रुम ऑफ वन्स ओन' या पुस्तकात पुरुष स्त्रीवर शारिरीक आणि सामाजिक वर्चस्व कसे निर्माण करतो याचे वर्णन केले आहे.

भारतात मात्र एकोणविसाव्या शतकाच्या अखेरीस आणि विसाव्या शतकाच्या प्रारंभीपर्यंत स्त्रीयांच्या हक्कासाठी पुढे येणारे पुरुषही नव्हते. तेव्हाच्या संगीत-नाटकात स्त्रीच्या भुमिकाही पुरुषच करीत. महात्मा ज्योतिबा फुले यांचा स्त्री शिक्षणाचा प्रयत्न त्यासाठी महत्त्वाचा. शिक्षणाच्या क्षेत्रात टाकलेले हे पाऊल स्त्रीमुक्तीसाठी अतिशय महत्त्वाचे ठरले.

स्त्री शिकू लागली, घराबाहेर पडली, तरी तीचे पूर्वीचे समाजातील स्थान फारसे बदलले नाही. स्त्री स्वातंत्र्याच्या नावाखाली तिचे अर्थार्जन सुरु झाले पण म्हणून तीची घरातील जबाबदारी काही कामी झाली नाही. काम करणाऱ्या स्त्रीहून घरातल्या कामाबरोबर बाहेरच्या कामाची जबाबदारी वाढली. तिची ओढताण होवू लागली, स्त्री बाहेर कितीही पदावर, यशस्वी असली तरीही तीने घरातल्या जबाबदाऱ्याही पार पाडल्याच पाहिजे ही सर्वसामान्य प्रथा तथाकथित मध्यम वर्गात अजूनही दिसतेच. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या मानव विकास अहवालात या संबंधीत काही आश्चर्यकारक माहिती समोर आली आहे. घरकाम आणि नोकरी असे दोन्ही प्रकारचे काम करणारी स्त्री सर्वसाधारण पुरुषापेक्षा जास्त काम करते. काही विकसनशील देशातील ग्रामिण भागातील स्त्री ही पुरुषापेक्षा २०% जास्त काम करते.

**कौटूंबिक हिंसाचार म्हणजे काय?**

कौटूंबिक हिंसाचार म्हणजे शारिरीक, शाब्दीक, लैंगिक,



PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli
Adarsh Arts & Commerce College (Desaiganj)